वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त,यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय निगडी यांच्याकडील दि.२९/१०/२०२० चे पत्र
४) दि.०३/१२/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५६४/२०२०
दि.०३/१२/२०२०

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.आनंद जनाजी गजरमल (सहा.शिक्षक)
सं.क्र.५८५०

आदेश,

श्री.आनंद जनाजी गजरमल हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. दि.०१/०७/१९८५ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झाले आहेत.त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख ३०/१२/१९६२ अशी असुन दिनांक २९/१२/२०२० रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट "क" मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.आनंद जनाजी गजरमल यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.आनंद जनाजी गजरमल यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.आनंद जनाजी गजरमल यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

श्री.आनंद जनाजी गजरमल यांना सेवासातत्य देण्यात आलेले आहे,असे विद्यालयाने कळविलेले आहे.परंतु त्यांच्या पुर्वीच्या संस्थेतील भविष्य निर्वाह निधि,निवृत्ती वेतन, ग्रॅच्युटी व इतर रक्कमा पिंपरी चिंचवड मनपा कोषागरात जमा केलेल्या पावत्या सादर करणेकामी माध्य/शि/०१/कावि/५६४/२०२० दि.१२/११/२०२०अन्वये कळविलेले होते,तथापी विद्यालयाने आजअखेर पिंपरी चिंचवड मनपा कोषागरात संबधीत रक्कमा जमा केलेल्या पावत्या सादर केलेल्या नाहीत.त्यामुळे श्री.गजरमल आंनद जनाजी सहा.शिक्षक यांची मनपा रूजु तारीख दि.०१ / ०७ / १९८५ ही ग्राह्य धरून ३१ / १२ /२०२० रोजी नियत वयोमाननुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.गजरमल आंनद जनाजी (सहा.शिक्षक ) यांना दिनांक - ३१/१२/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.आनंद जनाजी गजरमल (सहा.शिक्षक) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

Scanned with CamScanner

प्रती,

श्री.गजरमल आंनद जनाजी (सहा.शिक्षक)

माध्यमिक विद्यालय निगडी

प्रतः- १) लेखा शाखा

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय निगडी

२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner